dailyhunt

Hindusthan Samachar
134k Followers

# पुण्यातील रसायू कॅन्सर क्लिनिकच्या संशोधनावर जागतिक मोहर

28 Jul 2020 . 5:21 PM

पुणे 28 जुलै (हिं.स) सध्या कोरोनोवर आयुर्वेद जसे गुणकारी ठरत आहे तसेच कर्करोगाच्या रुग्णांना बद्धकोष्ठतेच्या त्रासातून मुक्त करण्यात आयुर्वेदातील गुणकारी औषध प्रभावी ठरते, असे संशोधन पुण्यातील रसायू कॅन्सर क्लिनिकने केले आहे. त्याबाबतचा शोधनिबंध 'युरोपियन सोसायटी आॅफ मेडिकल आँकोलॉजी' (इस्मो) या जागतिक परिषदेत सादर करण्यात आला. स्पेनमध्ये आॅनलाईन पद्धतीने नुकतेच पार पडलेल्या २२ व्या जागतिक कर्करोग परिषदेत रसायू कॅन्सर क्लिनिकचे वैद्य योगेश बेंडाळे यांनी हा शोधनिबंध सादर केला. हा शोधनिबंध अॅनल्स आॅफ आँकोलॉजी या जागतिक स्तरावर अत्यंत नामांकित अशा शोधपत्रिकेत प्रकाशित करण्यात आला आहे. कर्करोगावर उपचारासाठी दिलेल्या औषधांमधून विशेषतः केमोथेरपीनंतर रुग्णाला बद्धकोष्ठता होते. रुग्णाचे पोट व्यवस्थित नियमित साफ होत नाही. त्यावर आयुर्वेदिक औषध परिणामकारक उपाय करते, तसेच पोटाचा, यकृताचा स्वादुपिंडाच्या कर्करोगाशी संबंधित बद्धकोष्ठतेवरही हे औषध गुणकारी ठरत असल्याचे या संशोधनातून सिद्ध झाले आहे. आयुर्वेदिक औषध घेतलेल्या रुग्णांच्या बद्धकोष्ठतेच्या समस्येत लक्षणीय फरक पडला होता. बद्धकोष्ठतेवर प्रभावी उपचारातून कर्करोगाच्या शेवटच्या टप्प्यातील रुग्णाचे जीवन सुसह्य झाले पाहिजे, यावर या संशोधनाने भर दिला. या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल जगभरातील कर्करोग तज्ज्ञांनी याचे कौतुक केले. पण हा शोधनिबंध या परिषदेतील आकर्षणाचा प्रमुख केंद्र ठरला. स्पेनच्या परिषदेत सर्वाधिक भेट दिलेल्यांमध्ये याचा समावेश झाला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर रसायू कॅन्सर क्लिनिकला मान्यता मिळाली. असं संशोधनाच्या निष्कर्षाबद्दल बोलताना रसायू कॅन्सर क्लिनिकचे वैद्य योगेश बेंडाळे म्हणाले.
हिंदुस्थान समाचार

Disclaimer

**Likes (0)**

0

**#Hashtags**

#News

**Related Stories**

Raksha Bandhan: Books That Celebrate Sibling Love

